हिंदु विवाह याचिका क्र.१४०/२०२३
संतोष वि- पुजा
CNRNo.MHAM120001773-2023

## आदेश नि. क्र ६ वरील

(दिनांक ०८.०४.२०२४)

प्रस्तुतचा अर्ज हिंदू विवाह अधिनियम, १९५५ चे कलम २४ च्या तरतुदी अन्वये अंतरीम पोटगी मिळण्याकरीता उत्तरवादीने दाखल केला आहे.

२) थोडक्यात उत्तरवादीचे म्हणणे असे आहे कि, याचिकाकर्त्याने प्रस्तुतचे प्रकरण हिंदु विवाह कायदयाच्या कलम १३ नुसार याचिकाकर्ता व उत्तरवादी यांच्यातील विवाहाचे विच्छेदन होऊन मिळण्याकरिता दाखल केले आहे. याचिकाकर्त्याने तिला खुप शारीरिक आणि मानसिक त्रास दिलेला आहे. उत्तरवादी ही पाथर्डी येथे आई–वडिलांच्या दयेवर जीवन जगत आहे. याचिकाकर्ता हा डी. फार्म व बी. फार्म पर्यंत शिकलेला असून त्याचे स्वत:चे माऊली मेडीकल्स ॲन्ड जनरल स्टोअर्स नावाचे दुकान आहे. तसेच याचिकाकर्त्याचे वडील सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा वडनेर गंगाई येथे नोकरीवर आहेत. तसेच याचिकाकर्त्याकडे १० एकर सुपीक जमीन आहे. तसेच सिमेंट क्राँक्रीटचे दोन मजली घर आहे. याचिकाकर्त्यावर कोणाचीही पालन पोषणाची जबाबदारी नाही तसेच याचिकाकर्त्याचे मेडीकल दुकानापासुन दर महिन्याचे उत्पन्न हे ५० हजार रूपयांपेक्षा जास्त आहे. तसेच त्याला शेती पासुन दरवर्षी पाच लाखाचे उत्पन्न आहे. याचिकाकर्त्याचे वडील सेंट्रल बँकेत नोकरीवर असून त्यांना सुध्दा भरपुर पगार आहे. एकंदरीत याचिकाकर्त्याची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. उत्तरवादीवर मानसिक दबाव

टाकण्याच्या उद्देशाने याचिकाकर्त्याने घटस्फोटाचे खोटे प्रकरण दाखल केले आहे. याचिकाकर्त्याने उत्तरवादीची खाण्यापिण्याची, औषधपाण्याची व कपडेलत्त्याची कोणतीही व्यवस्था केली नाही. उत्तरवादीचे माहेर पाथर्डी ते दर्यापुर हे अंतर जवळपास ७० ते ८० कि. मी. असून उत्तरवादीला प्रकरण चालविण्यासाठी वडिलांसोबत यावे लागते व त्यासाठी बराच खर्च येतो. त्यामुळे उत्तरवादीला महिण्याकाठी रू.१५,०००/- याचिकाकर्त्याकडून मिळणे गरजेचे आहे आणि याचिकाकर्ता सदर रक्कम उत्तरवादीला सहज देवू शकतो.

३) याचिकाकर्त्याने सदर अर्जाला नि. क्र. ९ वर त्याचे म्हणणे सादर केले व प्रस्तुत अर्जाला विरोध केला आहे. त्याने त्याच्या अतिरिक्त जबाबात असे कथन केले आहे कि, त्यांचे लग्न दि.२७/०५/२०२२ रोजी झाल्यानंतर उत्तरवादी ही त्याच्या एकत्रीत कुटुंबात नांदायला आली. नांदायला आल्यानंतर उत्तरवादी फक्त १५ दिवस चांगली वागली. याचिकाकर्त्याने तिच्या नातेवाईकांना विचारपुस केली असता त्याला समजले कि, ती मानसिक रुग्ण असून लग्नाच्या आधीपासुनच ती मानसिक रोग तज्ञाचा उपचार घेत होती.

४) याचिकाकर्त्याचे पुढे असे कथन आहे कि, त्याचे शिक्षण डि.फॉर्म, बी.फॉर्म पर्यंत झालेले असून तो वासुदेव देवराव माहुरे यांच्या भाडयाच्या दुकानात माऊली मेडीकल या नावाचा व्यवसाय करतो व दरमहा दुकानाचे भाडे रु.४,०००/- देतो. याचिकाकर्त्यावर कुटुंबियांची जबाबदारी आहे तसेच याचिकाकर्ता मेडीकलचे दुकान चालवित असतांना भांडवल व भाडे कपात होवून याचिकाकर्ता यांना दिनचर्यासाठी पुरेशी रक्कम उरत नाही. तसेच सदरचे मेडीकल हे खेडेगावात असल्यामुळे तसेच कुठल्याही रुग्णालयाला संलग्न नसल्यामुळे त्याचे उत्पन्न फार कमी आहे. त्याचे वडील कुठल्याही नोकरीत नसून ते सेवानिवृत्त झाले आहे. त्याचे

आईवडील सतत आजारी राहत असल्यामुळे त्या दोघांच्या औषधोपचाराची जबाबदारी याचिकाकर्त्यावर आहे. उत्तरवादीला मानसिक आजार असल्यामुळे त्याने उपचारासाठी तीन ते चार वेळा डॉ. सुजय पाटील (मानसोपचार तज्ञ), अकोला यांच्याकडे घेऊन गेला होता. उत्तरवादी द्वारे मागण्यात आलेली अंतरीम पोटगी ही याचिकाकर्त्यावर अन्याय करणारी आहे. त्यामुळे त्याने प्रस्तुतचा अर्ज खारिज करण्याची विनंती केली.

५) विचारासाठीचे मुद्दे आणि त्यावरील माझे निष्कर्ष मी कारणमिसांसेसह खाली नमुद करीत आहे.

| | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | उत्तरवादी याचिकाकर्त्या कडुन अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय? | होय. |
| २. | आदेश काय ? | अंतीम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रं. १ व २ ला कारण:-**

६) उत्तरवादी तर्फे विद्वान विधिज्ञ व्ही. डब्ल्यु. जवंजाळ यांनी असा युक्तीवाद केला कि, याचिकाकर्त्याने उत्तरवादीची खाण्यापिण्याची, औषधपाण्याची व कपडेलत्त्याची कोणतीही व्यवस्था केली नाही. याचिकाकर्त्याचे स्वत:चे माऊली मेडीकल्स ॲन्ड जनरल

स्टोअर्स नावाचे दुकान आहे. तसेच त्याचे वडील सरकारी नोकरीत होते आणि त्याच्याकडे १० एकर सुपीक जमीन असून सिमेंट क्रॉंक्रीटचे दोन मजली घर आहे. याचिकाकर्त्यावर कोणाचीही पालन पोषणाची जबाबदारी नाही. त्यामुळे तो उत्तरवादीला खावटीची रक्कम सहज देवू शकतो.

७) याचिकाकर्त्यातर्फे विद्वान विधिज्ञ आम्रपाली चौरपगार यांनी असा युक्तीवाद केला कि, याचिकाकर्ता भाडयाच्या दुकानात माऊली मेडीकल या नावाचा व्यवसाय करतो तसेच तो मेडीकलचे दुकान चालवित असतांना भांडवल व भाडे कपात होवून त्यांना दिनचर्यासाठी पुरेशी रक्कम उरत नाही. तसेच सदरचे मेडीकल हे खेडेगावात असल्यामुळे तसेच कुठल्याही रुग्णालयाला संलग्न नसल्यामुळे त्याचे उत्पन्न फार कमी आहे. त्याचे वडील कुठल्याही नोकरीत नसून ते सेवानिवृत्त झाले आहे. त्याचे आईवडील सतत आजारी राहत असल्यामुळे त्या दोघांच्या औषधोपचाराची जबाबदारी याचिकाकर्त्यावर आहे. त्यामुळे त्यांनी हा अर्ज खारिज करण्याची विनंती केली.

८) प्रस्तुतचा अर्ज हिंदु विवाह अधिनियम चे कलम २४ अन्वये प्रकरण प्रलंबित असताना प्रकरणाच्या खर्चाच्या अनुषंगाने दाखल केला आहे. कलम २४ च्या अर्जाचा विचार करताना प्रस्तुत उत्तरवादीकडे प्रस्तुत प्रकरण पुढे चालवण्यासाठी कमाईचे पुरेसे साधन आहे काय आणि याचिकाकर्ता याच्याकडे उत्तरवादीला अंतरीम पोटगी देण्यासाठी उत्पन्नाचे पुरेसे साधन आहे काय याचा विचार करणे आवश्यक आहे.

९) याचिकाकर्तीने तसेच उत्तरवादीने दाखल केलेल्या मत्ता आणि दायित्व यांचे शपथपत्रांचे ( नि. क्र.१२ व नि. क्र. १४) अवलोकन केले. उत्तरवादीने तिच्या अर्जात तिच्याकडे

उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याचे कथन केले आहे. याचिकाकर्त्याने उत्तरवादीला काही स्वतंत्र कमाईचे साधन आहे, याबाबत काहीही पुरावा दिलेला नाही. त्यामुळे उत्तरवादी ही तिचा उदरनिर्वाह करण्यासाठी असमर्थ आहे असे सिध्द होत नाही.

१०) याचिकाकर्तीला सदर प्रकरण चालविण्याकामी वकिलांची नेमणुक करून न्यायालयात हजर राहणे आवश्यक आहे. ती महिला असल्यामुळे तिला एका पुरुष व्यक्तीला न्यायालयात सोबत आणावे लागते. याचिकाकर्त्याने दाखल केलेल्या मत्ता दायित्वाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते कि, याचिकाकर्ता मेडीकल दुकान चालवितो तसेच त्याच्या नावावर ८९ आर. जमीन आहे आणि त्याच्यावर रु.१,५०,०००/– चे मुद्रा कर्ज व रु. ६०,०००/– पिक कर्ज असल्याचे दिसून येते. उत्तरवादीने दाखल नि. क्र. १६ सोबत दाखल केलेल्या सातबारा उता–याचे अवलोकन केले असता याचिकाकर्त्याच्या वडिलांच्या नावावर देखील शेती असल्याचे दिसून येते. या वरुन असे निष्पन्न होते कि, याचिकाकर्ता हा मेडीकल चालवितो. त्याचे वडील सेवानिवृत्त आहेत. याचिकाकर्ता आणि त्याच्या वडिलांकडे शेती आहे. त्यामुळे याचिकाकर्त्याकडे उत्पन्नाचे पुरेसे साधन आहेत. त्यामुळे एकंदरीत याचिकाकर्त्याचे उत्पन्नाचे स्त्रोत, उत्तरवादीच्या मुलभूत गरजा, सध्याची महागाई, पक्षकारांचा राहणीमानाचा दर्जा, उत्तरवादी राहत असलेल्या ठिकाणापासुन या न्यायालयाचे अंतर विचारात घेता उत्तरवादीला अर्ज दाखल तारखेपासून याचिकेचा निकाल लागेपर्यंत न्यायालयात जाणे–येणे करण्यासाठी आणि उदरनिर्वाहासाठी दरमहा रू. ६,०००/– रूपये अंतरीम पोटगी मंजुर करणे संयुक्तीक वाटते. सबब वरील चर्चेअंती मुद्दा क्र.१ ला होकारार्थी उत्तर देवून मुद्दा क्र.२ ला अनुसरून खालील आदेश.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येते.

२. याचिकाकर्त्याने उत्तरवादीला हिंदू विवाह अधिनियमचे कलम २४ च्या तरतुदी अन्वये हा अर्ज दाखल तारखेपासुन ते या प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत दरमहा रू. ६,०००/- अंतरीम पोटगी म्हणून द्यावी.

३. याचिकाकर्ता याने अंतरीम पोटगीची अर्ज दाखल झाल्यापासुनची रक्कम वर नमुद रक्कम आजपासुन दोन महिण्याच्या आत उत्तरवादीस अदा करावी.

PATIL OMSHANKAR SHIVRAJ
Digitally signed by PATIL OMSHANKAR SHIVRAJ
Date: 2024.04.08 17:44:00 +0530

ठिकाण : दर्यापूर (**ओमशंकर शि. पाटील**)
दिनांकः ०८.०४.२०२४ दिवाणी न्यायाधीश (व.स्तर),दर्यापूर.